# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मानव विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाची स्थूल रुपरेषा**

**संशोधन विषय**

# मराठवाडा - कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोली : एक चिकित्सक अभ्यास


**संशोधक**

**बालाजी मदन इंगळे**

एम.ए. (मराठी), बी.एड.

**इंद्रायणी नगर, डिग्गी रस्ता, उमरगा,**

**ता. उमरगा, जि. उस्मानाबाद**

**मो. नं. ९८८१८२३८३३**

**ई-मेल : balajimingale@gmail.com**

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. पी.विठ्ठल**

**सहाय्यक प्राध्यापक,**

**भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

# मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्यालोकांची मराठी बोली : एक चिकित्सक अभ्यास

**प्रास्ताविक :-**

भाषा हे संवादाचे माध्यम आहे. मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाच्या आजच्या प्रगतीत भाषेचे स्थान खुप मोठे आहे. जेव्हा लेखन कलेचा शोध लागला नव्हता तेव्हा भाषा अस्तित्त्वात होती. 'आपसातील व्यवहारासाठी मानवाकडून जी ध्वनीयुक्त व्यवस्था अवलंबिली जाते तिला आपण भाषा म्हणतो.' एखाद्या भाषेमध्ये अनेक बोली असु शकतात अशा बोली मराठी भाषेमध्येही आहेत. दर बारा कोसावर भाषा बदलते असे म्हणतात. ते खरेही आहे. मराठीमध्ये अनेक बोली अस्तित्त्वात आहेत. या बोलीभाषांमध्ये वैविध्य दिसुन येते. एका भाषेत जितक्या जास्त बोली असतात तितकीच ती भाषा समृद्ध असते. या दृष्टीने मराठी भाषा समृद्ध आहे.

आज मराठी भाषेमध्ये विविध प्रदेशात वेगवेगळ्या बोली बोलल्या जातात. आजच्या अधुनिक तंत्रज्ञानाचा व माध्यमांचा प्रचंड प्रभाव असणाऱ्या काळातही मराठीतील या विविध बोलीभाषा आपले अस्तित्त्व टिकवून आहेत. काळानुसार या बोलीभाषांमध्ये थोडा फार परक पडलेला जाणवतो. काही नविन शब्द या बोलीभाषांमध्ये सामावून गेल्याचे दिसते. म्हणजे मराठीतील बोलीभाषा या लवचिक आहेत. बदलता काळा आणि बदलती परिस्थिती या बोली भाषांनी स्विकारल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातल्या काही विशिष्ट बोली भाषामधून ललित साहित्यही लिहिले गेले आहे. या दृष्टीने कोकणी, अहिराणी, बंजारा, चंदगडी, अदिवासी, दख्खनी, हळबी, मराठवाडी इत्यादी बोली भाषांचा उल्लेख करता येईल. आणि विशेष म्हणजे या बोलीभाषेतून लिहिले गेलेले साहित्यही वैशिष्ट्यपुर्ण असे आहे. व मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात याची दखलही घेतली गेली आहे.

मराठी मध्ये प्रमाणभाषा बोलणाऱ्यांपेक्षा बोली भाषा बोलणाऱ्यांची संख्या जास्त आहे. बोलीभाषेचे प्राबल्य असणाऱ्या सर्व प्रदेशात सर्व व्यवहार हे बोलीभाषेतुनच होतात. बोलीभाषा बोलणे-वापरणे म्हणजे गावंढळपणाचे समजले जाण्याचा काळ आता राहिला नाही.

अलिकडच्या काळात भाषेवर काम करणाऱ्या भाषा अभ्यासकांच्या मांडणीमध्ये बोलीभाषेला महत्त्वाचे स्थान मिळाल्याचे जाणवते. विशेषत: गणेश देवी यांनी बोलीभाषेच्या संदर्भात जे काम केले ते अतिशय महत्त्वाचे आहे. यामुळेच आज बोलीभाषेला व बोलीभाषेतुन लिहिल्या जाणाऱ्या ललित साहित्याला महत्त्वाचे असे स्थान प्राप्त झाले आहे. या दृष्टीने बोलीभाषा व त्या बोलीभाषेची सर्व अंगाने चिकित्सा होणे गरजेचे आहे. म्हणुनच प्रस्तुत विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे असे वाटते. म्हणुन प्रस्तुत विषयावर सविस्तर संशोधन करण्याचा मानस आहे.

मराठीमध्ये अहिराणी, कोकणी, चंदगडी, बंजारा, अदिवासी, दख्खनी आदी बोली बोलल्या जातात. या व्यतिरीक्त प्रत्येक छोट्या मोठ्या प्रदेशात अनेक बोली बोलल्या जातात. या बोलींवर अभ्यासकांनी संशोधनही केले आहे. या विविध बोलींबरोबरच आंतरराज्य सीमा भागात ज्या बोली बोलल्या जातात त्याकडे फारसे कुणाचे लक्ष गेले नाही. सीमा भागातील बोलींचेही एक वेगळे असे वैशिष्ट्य असते. कारण दोन्ही राज्यांशी या सीमालगतच्या रहिवाशांचा सतत संपर्क असतो आणि दोन्ही राज्यातील भाषांशीही त्यांचा संपर्क येतो आणि या दोन्ही वेगवेगळ्या भाषांच्या संपर्कातून एक वेगळीच बोली सीमालगतच्या भागात अस्तित्त्वात येते. या दृष्टीने मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोली या विषयावर संशोधन होणे आवश्यक वाटते.

**संशोधनाची गरज :**

मराठवाड्याला कर्नाटक राज्याची सीमा आहे. यामध्ये मराठवाड्यातील नांदेड, लातूर व उस्मानाबाद या जिल्ह्यातील काही तालुक्यांचा समावेश आहे. या मराठवाडा कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीमध्येही असेच वेगळेपण आढळून येते. निजामांची येथे राजवट होती म्हणून उर्दू भाषा, मातृभाषा मराठी म्हणून मराठी भाषा, शेजारी बरेच व्यवहार कर्नाटकातून होतात म्हणून कन्नड भाषा आणि आता प्रसारमाध्यमांचा प्रभाव म्हणून हिंदी व इंग्रजी भाषांचा प्रभाव व या सर्व भाषांची सरमिसळ इथल्या बोलीमध्ये झाल्याचे आढळून येते. म्हणूनच सीमेलगतच्या या बोलीचा अभ्यास होणे आवश्यक आहे असे वाटते.

अलिकडच्या काळात संपूर्ण जगात बोलीभाषांवर जे संशोधन झाले आहे त्यातुन एक गोष्ट अधोरोखित होते की, बोलीभाषा ही एकूण भाषेसाठी त्या भाषेचे अविभाज्य अंग असते. विविध भाषांमध्ये ज्या बोली भाषा असतात त्यामुळेच ती भाषा जिवंत असते. वेगवेगळे असे अभ्यासक व ललित लेखक यांनी आपल्या संशोधनातून व साहित्यातून बोली भाषेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. तसेच या बोलीभाषेला एक इतिहास असतो. एक संस्कृती असते आणि वैशिष्ट्यपुर्ण अशी शब्दसंपत्ती असते.  या सगळ्यांचे जतन व संवर्धन व्हायचे असेल तर बोलीभाषेचा सर्व बाजूंनी अभ्यास होणे आवश्यक आहे. मराठवाडा-कर्नाटक सिमेलगतच्या मराठी बोलीभाषेमध्ये हे सर्व असल्याचे जाणवते. आणि या बोलीभाषेचे जतन व संवर्धन करायचे असेल तर या बोली भाषेचा सर्व अंगाने अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणुन या बोलीभाषेवर संशोधन करण्याची गरज आहे असे वाटते. संशोधनामुळे मराठवाडा-कर्नाटक सिमेलगतच्या मराठी बोलीचे जतन व संवर्धन होईल असे वाटते.

मराठवाडा - कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोलीचे मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण होणे आवश्यक आहे असे वाटते.  या सीमा भागातील संस्कृती, उत्सव, धार्मिक विधी, कुटुंब व्यवस्था, परंपरा, श्रद्धा संकल्पना या अनुषंगाने या बोलीचे मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होणे आवश्यक आहे असे वाटते.

या बोलीभाषेमध्ये काही वैशिष्ट्य आढळतात का ? या बोलीची स्वतंत्र अशी स्वनीम व्यवस्था, उच्चार प्रक्रिया, अर्थव्यवस्था आहे का ? याचा भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे गरजेचे वाटते. जेणेकरुन एका नव्या बोलीचे संपूर्ण व्याकरणीक स्वरुप सर्वांसमोर येईल. तसेच या बोलीची स्वतंत्र अशी शब्दसंपत्तीही या निमित्ताने संकलित होईल. या सर्वच बाबींमुळे या बोलीच्या संशोधनाची गरज वाटते. त्यामुळेच संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

## प्रकरणनिहाय विभागणी

### प्रकरण एक

### मराठीतील अहिराणी, चंदगडी, वऱ्हाडी, झाडीबोली इ. बोलींचे स्वरुप :

या प्रकरणात मराठीतील विविध अहिराणी, चंदगडी, वऱ्हाडी, झाडीबोली इ. स्वरुप : बोलींचे स्वरुप, त्यांची थोडक्यात वैशिष्टये, वेगळेपण व महत्त्व यांचा अभ्यास केला जाईल.

### प्रकरण दोन

### मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीचे भाषा वैज्ञानिक दृष्टीकोनातून विश्लेषण.

या प्रकरणात उच्चार प्रक्रिया, स्वनिम व्यवस्था, वर्ण प्रक्रिया, लिंग व्यवस्था, वचन प्रक्रिया, विभक्ती प्रक्रिया, सामान्यरुप, वाक्य व्यवस्था, क्रियापदे, अर्थव्यवस्था, प्रत्यय प्रक्रिया, इत्यादी दृष्टीकोनातून विश्लेषण केले जाईल.

### प्रकरण तीन

### मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीचे मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण

या प्रकरणामध्ये संस्कृती, उत्सव, धार्मिक रुढी, कुटुंब व्यवस्था, परंपरा, श्रद्धा संकल्पना या अनुषंगाने या बोलीभाषेचा अभ्यास केला जाईल.

### प्रकरण चार

### मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीचा वैशिष्टपुर्ण शब्दसंग्रह

या प्रकरणात मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीतील वैशिष्टपुर्ण अशा शब्दांचा अभ्यास केला जाईल.

### प्रकरण पाच

### मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीवर कन्नड, उर्दु व इंग्रजी भाषांचा प्रभाव.

या प्रकरणात मराठवाडा, कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीवर कन्नड, उर्दु व इंग्रजी या भाषांच्या प्रभावाचा अभ्यास केला जाईल.

### प्रकरण सहा

### निष्कर्ष व उपसंहार

प्रस्तुत संशोधन विषयाचा निष्कर्ष व उपसंहार या प्रकरणात मांडला जाईल.

**उद्दिष्टे :-**

१) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीचा भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून आढावा घेणे.

२) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीतील वैशिष्टय पूर्ण शब्दसंपत्तीचा परिचय करुन देणे.

३) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीवर इतर भाषांच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

४) मराठवाडा कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीचा मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण करणे.

५) मराठीतील इतर बोलींपेक्षा मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतची मराठी बोली आपले वेगळेपण जपून आहे का ? याचा शोध घेणे.

६) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतची मराठी बोली समाजगटानुसार व व्यवसाय गटानुसार बदलते का ? याचा शोध घेणे.

७) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीचे स्वतंत्र अस्तित्त्व आहे का ? याचा शोध घेणे.

**गृहितके :-**

१) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीचे स्वत:चे असे एक वेगळे वैशिष्टय दिसून येते.

२) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीवर कानडी भाषेचा प्रभाव दिसून येतो.

३) समाजगटाप्रमाणे मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या भागात बोलीचे वैविध्य दिसून येते.

४) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीमध्ये स्वत:ची स्वतंत्र अशी शब्दसंपत्ती आढळून येते.

५) बोलींमध्ये काळानुसार झालेला बदल याबोलीने स्वीकारल्याचे दिसून येते.

६) समाजातील जाती व व्यवसायानुसार बोलीच्या रुपात फरक दिसून येतो.

७) कन्नड, इंग्रजी, उर्दू, हिंदी भाषांच्या आक्रमनानंतरही मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतची मराठी बोली आपले स्वतंत्र अस्तित्त्व टिकवून आहे.

८) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या मराठी बोलीमध्ये स्वनिम प्रक्रियेत विविधता आढळते.

९) मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या भागात मराठी बोलीचे प्राबल्य असल्याचे दिसून येते.

## **संशोधन साहित्याचा आढावा व कार्यक्षेत्र :-**

'मराठवाडा-कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोली : एक चिकित्सक अभ्यास' याविषयावरील संशोधनासाठी भाषा व बोलीभाषा या विषयावरील प्रकाशित पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.त्याची नोंद परिशिष्टामध्ये करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे या संशोधनासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले ओह.

**भूप्रदेश :** लातूर जिल्हा (निलंगा, उदगीर तालुका)

उस्मानाबाद जिल्हा (उमरगा तालुका)

## **संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी भाषाशास्त्रीय, समाजशास्त्रीय, सर्वेक्षणात्मक, मुलाखत ग्रंथालयीन इत्यादी संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल. याशिवाय सीमेलगतच्या गावांना भेटी देवून बोलीचे स्वरुप समजून घेतले जाईल. सीमेलगतच्या काही रहिवाशांशी गरजेप्रमाणे संवादही साधला जाईल.

## परिशिष्ट

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. धनपलवार माणिक | :- | दक्षिणात्य साहित्य संस्कृतीचा मराठीशी अनुबंध |
| २) | डॉ. नाईक शोभा | :- | मराठी-कन्नड सांस्कृतिक सहसंबंध |
| ३) | संपादक डॉ. पाटील अशुतोष, डॉ. पगारे म. सु. | :- | बोलीभाषा : संशोधनाच्या नव्या दिशा |
| ४) | डॉ. भोसले द. ता. | :- | ग्रामीण बोलीचा शब्दकोश |
| ५) | चपळगांवकर नरेंद्र | :- | दीपमाळ |
| ६) | डॉ. पानतावणे गंगाधर, डॉ. सोलनकर अशोक | :- | दलित- ग्रामीण साहित्य : रुढी, प्रथा, परंपरा, विधीकोश. |
| ७) | कालेलकर ना. गो. | :- | भाषा : इतिहास आणि भुगोल |
| ८) | मो.के. दामले | :- | शास्त्रीय मराठी व्याकरण |
| ९) | काळे कल्याण, डॉ. सोमण अंजली | :- | आधुनिक भाषाविज्ञानः संरचनावादी आणि सामान्य |